आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दु १.३० वाजता

२३ जून २०२४ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- १८ व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन उद्यापासून, २६ जून रोजी होणार सभापतीपदाची निवडणूक

- पूरव्यवस्थापनाचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक

- नीट-यूजी परीक्षेत अतिरिक्त गुण मिळालेल्या सर्व एक हजार ५६३ विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा आज

- टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताचा बांगलादेशवर ५० धावांनी विजय

**आणि**

- टेनिसपटू सुमीत नागलचं पॅरिस ऑलिम्पिकमधलं स्थान निश्चित

**<><><><><>**

१८ व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन उद्यापासून सुरू होणार आहे. अधिवेशनादरम्यान नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी होईल. लोकसभेचे हंगामी सभापती ज्येष्ठ भाजप खासदार भर्तृहरी महताब हे नवनिर्वाचित खासदारांना शपथ देतील. लोकसभा सभापतीपदासाठी येत्या २६ जून रोजी निवडणूक होणार आहे. राज्यसभेचं अधिवेशन येत्या २७ तारखेला सुरू होणार आहे. त्याच दिवशी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं अभिभाषण दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीसमोर होईल. हे अधिवेशन ३ जुलै पर्यंत चालेल.

**<><><><><>**

मान्सूनच्या पार्श्वभूमीवर पूरव्यवस्थापनाचा आढावा घेण्यासाठी नवी दिल्लीत एक उच्चस्तरीय बैठक सुरु आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखालील या बैठकीत गृहराज्यमंत्री नित्यांनंद राय, केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील तसंच विविध खात्यांचे वरिष्ठ अधिकारी या बैठकीत उपस्थित आहेत.

**<><><><><>**

वस्तु आणि सेवा कर परिषदेनं पोलाद, लोह आणि ॲल्युमिनियमपासून निर्मित दुधाच्या कॅनवर १२ टक्के वस्तू आणि सेवा कर म्हणजे जीएसटीच्या एकसमान दराची शिफारस केली आहे. नवी दिल्ली इथं काल झालेल्या ५३व्या वस्तु आणि सेवा कर परिषदेच्या बैठकीनंतर अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी माध्यमांशी बोलताना, रेल्वे फलाट तिकिटं, विश्राम कक्ष आणि प्रतीक्षा कक्षाच्या सुविधांसाह भारतीय रेल्वेकडून सर्वसामान्य नागरिकांना पुरवल्या जाणाऱ्या सेवा तसच बॅटरीवर चालणाऱ्या कार सेवांवर कोणताही जीएसटी लागणार नाही अशी घोषणा केली. विविध प्रकारच्या पुठ्ठ्यांच्या खोक्यावर १२ टक्के एकसमान जीएसटी दराची शिफारस परिषदेनं केली आहे हिमाचल प्रदेश आणि जम्मू आणि काश्मीरच्या सफरचंद उत्पादकांना याचा फायदा होईल असं सीतारामन यांनी सांगितलं. बायोमेट्रिक-आधारित आधार प्रमाणीकरण अखिल भारतीय आधारावर लागू केलं जाणार असून खोट्या इनव्हॉइसद्वारे केलेल्या इनपुट टॅक्स क्रेडिटच्या दाव्यांना आळा घालण्यात याची मदत होईल अशी अपेक्षा असल्याचं त्या म्हणाल्या. लहान करदात्यांच्या सुविधेसाठी GSTR-4 फॉर्ममध्ये तपशील आणि रिटर्न सादर करण्यासाठीची मुदत ३० एप्रिल वरुन ३० जून पर्यंत वाढवण्याची शिफारसही परिषदेनं केली आहे.

<><><><><>

वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या नीट-यूजी परीक्षेत अतिरिक्त गुण मिळालेल्या सर्व एक हजार ५६३ विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा आज होणार आहे. राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या उच्चस्तरीय समितीच्या अहवालावर सर्वोच्च न्यायालयानं नोंदवलेल्या निरीक्षणांच्या आधारे या विद्यार्थ्यांना दिलेले अतिरिक्त गुण रद्द करून फेरपरीक्षेचा निर्णय घेतल्याचं राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं म्हटलं आहे. ज्या विद्यार्थ्यांना फेरपरीक्षा द्यायची नसेल, त्यांना अतिरिक्त गुणांविना मिळालेले गुण ग्राह्य धरले जातील, असंही संस्थेनं स्पष्ट केलं आहे.

नीट परीक्षा पेपरफुटीप्रकरणी दहशतवादविरोधी पथकानं आज पहाटे लातूर जिल्ह्यातल्या दोन शिक्षकांना अटक केली. हे दोघे शिक्षक नीट परीक्षेसाठी खासगी शिकवण्या चालवत होते. त्यांची चौकशी सुरू आहे. तर बिहार पोलिसांनी या प्रकरणातल्या ६ संशयितांना झारखंडमधून अटक केली आहे.

दरम्यान, नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाचा तपास शिक्षण मंत्रालयानं सीबीआय, अर्थात केंद्रीय गुन्हे अन्वेषण संस्थेकडे सोपवला असून राष्ट्रीय चाचणी संस्थेचे महासंचालक सुबोध कुमार सिंग यांना पदावरून हटवलं आहे. भारतीय व्यापार प्रोत्साहन मंडळाचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक प्रदीप सिंग खरोला यांच्याकडे एनटीएच्या महासंचालकपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे.

<><><><><>

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आज संयुक्त अरब अमिरातीच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात ते अरब अमिरातीच्या परराष्ट्र मंत्र्यांची भेट घेऊन दोन्ही देशांमधल्या अनेक महत्त्वाच्या मदुद्यांवर चर्चा करणार आहेत. या

दौऱ्यामुळे दोन्ही देशांतल्या परस्पर भागीदारीविषयी आणि विविध जागतिक मुद्द्यांवर चर्चा करण्याची संधी मिळेल असं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><>**

दिवंगत शामाप्रसाद मुखर्जी यांच्या स्मृतीदिनानिमित्त केंद्रीय मंत्री आणि भाजपाचे राष्टीय अध्यक्ष जे पी नड्डा यांनी आज मुखर्जी यांना पुष्पांजली वाहिली. स्वातंत्र्यसैनिक, शिक्षणतज्ञ तसंच सामाजिक कार्यकर्ते असलेले मुखर्जी हे एक बहुआयामी व्यक्तीमत्व होते असं नड्डा यावेळी म्हणाले. नवी दिल्लीत भाजपाच्या मुख्यालयात नड्डा यांच्या हस्ते कार्यकर्त्यांना रोपांचं वाटपही करण्यात आलं.

**<><><><>**

उत्तर काश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यात उरी इथं नियंत्रणरेषेजवळ सुरू असलेल्या घुसखोरीविरोधी कारवाईदरम्यान सुरक्षादलांनी एका अतिरेक्याला ठार केलं आहे. बजरंग-उरी भागात काही घुसखोर अतिरेकी असल्याची बातमी मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी इथं शोधमोहीम सुरू केली. लपून बसलेल्या अतिरेक्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार सुरू केल्यावर सुरक्षा दलांनी त्यांना प्रत्युत्तर दिलं. यात एक अतिरेकी ठार झाला.

**<><><><>**

टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत काल रात्री झालेल्या सामन्यात भारतानं बांगलादेशचा ५० धावांनी सहज पराभव केला. अँटीग्वा इथल्या सर व्हिव्हियन रिचर्ड्स मैदानावर झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारतानं निर्धारित २० षटकांमध्ये पाच गड्यांच्या मोबदल्यात १९६ धावांचं मोठं आव्हान बांगलादेशसमोर ठेवलं. हार्दिक पंड्यानं फक्त २७ चेंडूंमध्ये ५० धावा फटकावल्या,

तर ऋषभ पंतनं २८ चेंडूंमध्ये ३७ धावा केल्या. १९७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना बांगलादेशला २० षटकांमध्ये ८ गड्यांच्या मोबदल्यात १४६ धावाच करता आल्या. हार्दिक पंड्या सामनावीर ठरला.

आज सकाळी झालेल्या सामन्यात अफगणिस्ताननं ऑस्ट्रेलियाच्या संघावर २१ धावांनी मात केली. जमैकात किंगस्टन इथं झालेल्या या सामन्यात अफगाणिस्ताननं निर्धारित २० षटकांत ५ गड्यांच्या मोबदल्यात १४८ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल ऑस्ट्रेलियाचा संघ १९ षटकं आणि २ चेंडूंमध्ये १२७ धावांवरच गारद झाला. सामनावीर ठरलेला अफगाणिस्तानचा अष्टपैलू खेळाडू गुलबदीन नईब यानं चार गड्यांना तंबूत धाडलं.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमध्ये भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतला शेवटचा सामना आज बंगळुरूच्या चिन्नास्वामी मैदानावर होत आहे. दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आहे. या मालिकेतले आत्तापर्यंतचे दोन्ही सामने भारतानं जिंकले आहेत.

**<><><><><>**

टेनिसपटू सुमीत नागल यानं आगामी २०२४ पॅरिस ऑलिम्पिकमधलं आपलं स्थान निश्चित केलं आहे. या हंगामात सुमितनं हेलबॉन चॅलेंजर आणि चेन्नई चॅलेंजर स्पर्धेचं जेतेपद पटकावलं आहे. यापूर्वी टोक्यो ऑलिम्पिकमध्ये सुमीत दुसऱ्या फेरीपर्यंत पोहोचला होता. रोहन बोपण्णा आणि एन. श्रीराम बालाजी ही जोडीही पुरुष दुहेरीत ऑलिम्पिकसाठी पात्र ठरली आहे.

**<><><><><>**

आज आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक दिन आहे. जगभरात खेळ आणि शारीरिक कसरतींना प्रोत्साहन देण्यासाठी १९४८ पासून हा दिवस साजरा केला जातो. यंदाच्या ऑलिंपिक दिनाचं घोषवाक्य पुढे चला आणि साजरा करा अशी आहे.

युवा आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. एकता आणि शांततेला प्रोत्साहन देण्यासाठी खेळाच्या ऊर्जेचा वापर करायला हवा. असं त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. यंदाच्या पॅरिस ऑलिंपिक साठी तयारी करणाऱ्या खेळाडूंनाही त्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

केरळ, कर्नाटक आणि गोव्यात पुढचे चार दिवस अतिजोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. तमिळनाडू, महाराष्ट्र आणि गुजरातमध्येही विजांचा गडगडाट आणि वादळी वाऱ्यांसह अतिजोरदार पावसाची शक्यता आहे. ईशान्य भाग आणि पश्चिम बंगालच्या हिमालयाजवळच्या भागात पुढचे पाच दिवस जोरदार ते अतिजोरदार पाऊस पडेल. उत्तराखंड, उत्तर प्रदेश, राजस्थान, जम्मू-काश्मीर आणि हिमाचल प्रदेशात पुढचे दोन ते तीन दिवस विजांचा गडगडाट आणि जोराच्या वाऱ्यांचा अंदाज आहे. दरम्यान, उत्तर प्रदेश, पंजाब, हरयाणा, चंडीगड आणि दिल्लीच्या तुरळक भागांमध्ये पुढचे दोन दिवस उष्णतेच्या लाटेसारखी परिस्थिती राहील आणि त्यानंतर पारा खाली येईल, अशी माहिती हवामान विभागानं दिली आहे.

**//<><><><><>//**